**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय,विरार**
**ता.वसई, जि.पालघर**

---

जा.क्र.वविशम/वाहन/३४७/२०२१
दिनांक :- २७/१२/२०२१

## जाहीर दरपत्रक

यांव्दारे सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मालकिच्या वाहनांचे दुरुस्तीअंती निकामी झालेले स्पेअर पार्टस् विक्री करणेकामी इच्छुक व्यक्ती, पुरवठादार व संस्था यांचेकडुन दि. २८/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता बंद पाकीटातुन दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके मुख्यालय, वाहन विभागात सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील / ठिकाण | अंदाजित रक्कम | अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.के.एल.एंटरप्रायजेस वसई गॅरेज | रु. १२,०००/- | |
| २ | डंम्पिंग ग्राऊंड | रु. ९०,०००/- | |
| ३ | फुलपाडा डॅम | रु. १५,०००/- | |

## अटी-शर्ती

१) खरेदीदाराने स्वत:चे लेटर पॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहील.

२) मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहुन करारनामा करणे बंधनकारक राहील.

५) मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

६) दरपत्रकात दर सादर करताना मुळ किंमत, वस्तु व सेवा कर (GST) व इतर सर्व करासहीत भरावयाचे आहेत.

७) उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या अंदाजित रकमेपेक्षा जास्त अपेक्षित रक्कम भरणा केलेल्या दरास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

८) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उप. आयुक्त यांना राहील.

९) वरील अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात येईल.

१०) यासंबंधीची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकीटातुन दि.०४/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

११) उपरोक्त तक्त्यातील निकामी स्पेअर पार्टस् दि. ३१/१२/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत स. ९.४५ ते सायं. ५.४५ पहावयास मिळेल.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०४/०१/२०२२ रोजी सायं ४.०० मा.उप.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकावर अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार**
**दिनांक :- २७/१२/२०२१**

**सही/-**
**उप.आयुक्त (वाहन)**
**वसई विरार शहर महानगरपालिका**